
# २२. मधमाशीने केली कमाल!

एक होता शेतकरी. तो शेतात खूप कष्ट करायचा. शेताभोवती त्याने झाडे लावली होती. त्या झाडांवर मधमाशी, कोकिळा, खारूताई, चिमणी व कावळा राहत होते. त्या झाडाभोवती मुंग्याही राहत होत्या. त्या सर्वांची खूप मैत्री होती.

एके दिवशी एक मुंगी बाहेर फिरायला गेली. फिरता फिरता ती शेतात पोहचली. शेतात होती सूर्यफुले–पिवळीधमक, टपोरी आणि टवटवीत. मुंगीला फुले खूप आवडली.



ती गेली शेतकऱ्याकडे. त्याला म्हणाली, ''शेतकरीदादा, शेतकरीदादा काम करता सदान्कदा, करणार का यंदा फुलांचा धंदा ?''

शेतकरी म्हणाला,

''हो गं बाई, करतो ना धंदा. फुले तोडतो, बिया वाळवतो. तेलासाठी बिया पेरतो. सर्वांसाठी कष्ट करतो.''

शेतकऱ्याचे बोलणे ऐकून मुंगीच्या मनात एक विचार आला. तिने शेतकऱ्याकडून एक फूल घेतले. घरी आली, फुलातल्या बिया काढल्या. काही बिया कोकिळेला दिल्या. काही बिया खारूताईला दिल्या. काही चिमणीला, तर काही बिया कावळ्याला नि मधमाशीला दिल्या. स्वतःही काही घेतल्या. त्यांतल्या काही बिया खाल्ल्या आणि पुढच्या वर्षी खाण्यासाठी काही बिया जपून ठेवल्या.

कोकिळेच्या कपाळावर आल्या आठ्या. तिने कावळ्याच्या घरट्यात ठेवल्या बिया. कावळ्याने बिया पाहिल्या. तो म्हणाला,



''का ग बाई असं करतेस ? अंड्यांबरोबर बियाही ठेवतेस ?
नको माझ्या घरट्यात बिया, सगळ्या बिया जातील वाया.''

कावळ्याने बिया उचलल्या आणि टाकून दिल्या. चिमणीने पाहिल्या बिया. बसली बिया सोलायला. सोलता सोलता कंटाळा आला. 'काय बाई त्रास' म्हणत निघून गेली खेळायला. खारूताई होती खूप चपळ, सारखी तिची पळापळ. बिया घेऊन झाडाच्या शेंड्यावर गेली. प्रत्येक बी लपवून ठेवली. शेंड्यावरून जमिनीवर, जमिनीवरून शेंड्यावर. खेळता खेळता बी अन् बी खाऊन टाकली.



मधमाशी होती मोठी चतुर. काम करण्यास नेहमीच आतुर.

बिया पाहून विचारात गढली.



'करावे काय बियांचे ?
भले व्हावे सर्वांचे.
उपाय काही सुचेना,
झोप काही लागेना.'



सकाळ होताच चटकन उठली. बिया घेऊन जमिनीवर आली.

आनंदाने गाऊ लागली – ''या रे या मित्रांनो, खड्डा करूया गड्यांनो.''

कावळा म्हणाला, ''कशासाठी, कशासाठी ?''

मधमाशी म्हणाली, ''बिया रुजत घालण्यासाठी.''

यावर कोकिळा म्हणाली,



''मला नाही वेळ.
कामाचा अन् माझा
कधी बसायचा मेळ ?''

कोकिळा गेली उडून, चिमणी राहिली झोपून.

कावळा म्हणाला,

''माझ्याच्याने होणार नाही.
काम करून दमलोय बाई.''



खारूताई आली सरसर. डोळे फिरवत गरगर. मधमाशीला म्हणाली,

''ताई, ताई थांबतेस का जरा?
बघ, सुटलाय छानसा वारा.
खेळून घेते पोटभर,
तोपर्यंत काम तूच कर.''

मग मधमाशीने बिया रुजत घातल्या. पावसाळा आला. पाऊस पडला. बिया रुजल्या. रोपटी भरभर वाढू लागली. त्याला पिवळी फुले आली. फुले वाऱ्यावर डोलू लागली. फुले पाहून मधमाशी आनंदाने गाऊ लागली –



''रुजत घातल्या बिया चार,
त्याला आली फुले फार.
कामाची धरा रे कास,
तरच मिळेल पोटाला घास.''

**शब्दार्थ : रुजत घालणे** – जमिनीत बी लावणे. **कामाची कास धरणे –** काम करण्यास तयार होणे.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सूर्यफुलाचे वर्णन करणारे शब्द कोणते ?

(आ) मुंगीने शेतकऱ्याला कोणता प्रश्न विचारला ?

(इ) मुंगीला फूल का आवडले ?

(ई) चिमणी खेळायला का निघून गेली ?

**प्र. २. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) झाडांवर कोण कोण राहत होते ?

(आ) मुंगीने कोणाकोणाला बिया दिल्या ?

**प्र. ३. कोणी केले ते लिहा.**

(अ) बिया दुसऱ्याच्या घरट्यात ठेवल्या.

(आ) बिया सोलल्या.

(इ) सगळ्या बिया खाल्ल्या.

(ई) बिया टाकून दिल्या.

(उ) बिया रुजायला घातल्या.

**प्र. ४. कशासाठी ते लिहा.**

(अ) मधमाशी सर्वांना बोलवत होती.

(आ) मुंगीने बिया जपून ठेवल्या.

(इ) खारूताई शेंड्यावर गेली.

(ई) शेतकरी बियांतून तेल गाळतो.

**प्र. ५. कोण म्हणाले ?**

(अ) फुले तोडतो, बिया वाळवतो.

(आ) सगळ्या बिया जातील वाया.

(इ) कशासाठी ? कशासाठी ?

(ई) तरच मिळेल पोटाला घास.

**प्र. ६. विविध तेलबियांची नावे लिहा व संग्रह करा.**

**उपक्रम :** मधमाशीबद्दलची माहिती मिळवा. वर्गात सांगा.